७ ३३५

म. ग्रं. सं. ठाणें

विषय: काव्य

लेखक: य. बा. क्षीरसागर

सन: १८९६

ग्रंथालय क्रमांक: ११६२

पुस्तकाचें नांव: अगदीं नवीन (कविता)

११६२

...प्रसिद्ध होऊन ( कविता. )
...त्रांस पसंत ...
आम्हीं त्या छ... हें पुस्तक
...सिद्ध केल्या आहेत.

# अगदीं न...

## (कविता)

प्रकाशक
यशवंत बाळकृष्ण
क्षीरसागर
जनरल मर्चंट कमिशन
एजंट
गिरगांव चर्नीरस्ता मुंबई.

किंमत चार आणे

...गु-
...त्येक
...मुर-
...; परंतु
असतां व

334
काव्य.

[illegible] 'उपयुक्त पुस्तकमाला' नंबर २.

Through H.A. Ghaneka[illegible]

# अगदींच नवीन!

नं. [illegible] १३८

( कविता. )

हें पुस्तक

यशवंत बाळकृष्ण क्षीरसागर,

जनरल मर्चंट्, कमिशन एजंट, गिरगांव, चर्नीरस्ता

यांनीं

मुंबईंत:

"युनिव्हर्सल" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १८१८, सन १८९६.

किंमत ४ आणे.

ह्या पुस्तकासंबंधी सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

कांहीं पुणेकरांच्या अश्रांत परिश्रमानें हल्लीं आर्यावर्तांत स्वत्वाची उकळी उसळून जो तो यथाशक्ति देशसेवा, मातृभाषासेवा व स्वधर्मसेवा करण्यास उत्सुकतेनें लागत आहे. अशा वेळीं लुंग्यासुंग्या मनुष्यासहि आपले हातपाय हालवून कृतज्ञता प्रगट करण्याचा हौस येणारच; आणि हें चिमुकलें पुस्तक त्याच हौसेचें एक फळ होय.

या पुस्तकांतील विषयमालिकेकडे लक्ष दिलें असतां सहज दिसून येईल कीं, यांतील कांहीं विषय टीकाविषयक असून त्यांचा सामाजिक सुधारणेशीं बराच निकट संबंध आहे. परंतु त्यामध्यें पुस्तककर्त्यांनीं वस्तुविपर्यास न करतां समाजांतील वास्तविक दोष दाखविण्याचाच प्रयत्न केला आहे हें कोणत्याहि सूज्ञ वाचकाच्या सहज ध्यानांत येईल. यांतील लेख कोणत्याही विशिष्ट व्यक्तीस अनुलक्षून केवळ निंदेच्या हेतूनें लिहिलेले नसून फक्त वस्तुस्थिति लोकांपुढें मांडण्याच्या सद्धेतूनेंच प्रयत्न केला आहे. यांतील कांहीं लेख पाश्चिमात्य रवीच्या किरणांनीं दिपून जाऊन अंधप्राय झालेल्या कांहीं व्यक्तींस 'बाबा वाक्यं प्रमाणम्' या महातत्वाची कांस धरून ऐहिक सुखाची व्यर्थ इच्छा करणाऱ्या कांहीं व्यक्तींस रुचणार नाहींत हें आह्मी जाणून आहों. परंतु, मनाची समता राखून न्यायदेवतेला स्मरून व कुत्सित बुद्धीला फांटा देऊन जे हें पुस्तक वाचतील त्यांचें यांत दोन घटका मनोरंजन होऊन यांत कांहींतरी घेण्यासारखें आहे असें त्यांस वाटेल अशी आमची उमेद आहे. जे विषय केवळ मनोरंजनाचे आहेत त्यांविषयीं अधिक कांहींच लिहिण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

३ या कवितांतील भाषेसंबंधीं चार शब्द लिहिणें जरूर आहे. महाराष्ट्र कविकुलगुरु मोरोपंत, पंडितराय इत्यादिकांच्या काव्यकुसुमगुच्छांच्या मधुररसास्वादानें गुंग होऊन गेलेल्या आमच्या कित्येक वाचकवृंदास या कवितांतील भाषा फारच साधी वाटून ते नाकें मुरडतील हें समजण्यास फारशा तर्कज्ञानाची आवश्यकता नको; परंतु बहुजनसमाजाच्या स्थितीचें सुक्ष्म अवलोकन केलें असतां व

कांहीं अर्वाचिन कविवर्यांच्या काव्यांचे परीक्षण केलें असतां कोणी त्याही मनुष्याच्या हें सहज लक्षांत येईल कीं हल्लीं पंतांच्या प्रौढ रचनेविषयींची व पंडितांच्या तर्कवादाची अभिरुचि कमी होऊन साध्या, सरल व प्राकृत रचनेची गोडी लागत चालली आहे व त्याच जनमनप्रवृत्तीकडे लक्ष देऊन ह्या पुस्तकांतील रचना साधली आहे. या पुस्तकांत ऱ्हस्व, दीर्घ, छंदोभंग, अनुस्वारादिकांची शुद्धता ठेवण्याविषयीं खबरदारी घेतली आहे, तथापि ज्या अर्थी कोणतीहि मानवी कृति अगदीं निर्दोष असणें अशक्य आहे त्या अर्थी या पुस्तकामधें चुकभूल होऊन कांहीं दोष राहिले असल्यास त्याबद्दल आमचे समंजस वाचक आमचेवर घुस्सा होणार नाहींत अशी आह्मास बळकट आशा आहे.

४ या पुस्तकांतील बऱ्याच कविता पुण्य नगरींतील लोकप्रिय झालेल्या **करमणूक** पत्रांत प्रसिद्ध झाल्या आहेत. हें पुस्तक छापित असतां ज्या गृहस्थांनीं आह्मास आपआपल्या परीनें साहाय केलें आहे त्यांचे आभार आह्मी मनापासून मानतों. त्यांत विशेषतः आमचे प्रियमित्र रा. रा. **वि. ह. ठाकूर.** बी. ए. व रा. रा. **मा. ना. धामणकर** यांनीं प्रुफें तपसतांना घेतलेल्या श्रमाबद्दल आह्मीं त्यांचे फारच आभारी आहों.

५ शेवटीं या चिमुकल्या पुस्तकाची चिमुकली प्रस्तावना सूज्ञ वाचकांस पुढील विनंति करून संपवितों:—

**समर्पीतों आह्मी स्वकृति तुमच्या आज पदरीं ॥**
**तरी वागा हीशीं धरुनि करुणा नित्य उदरीं ॥**
**असे साधी भोळी सुमति सरला अल्लड जरा॥**
**सुधारा दोषातें गुण बघुनियां कौतुक करा ॥**

रा.काव्य २३८

# अगदींच नवीन !

## सासूची जबानी.

महासद्गुणी रूपखाणी विनीता ।
अशी सून होती सती जेविं सीता ॥
छळीलें परी तीस मी कैकईनें ।
तिचे हाल केले अहा ! कैक ईनें ॥ १ ॥

धरूनी मनीं बाइ, दुर्वासनेला ।
छळीलेंच मी सद्गुणी त्या सुनेला ॥
सुखें तीस खाऊं दिला नाहिं घास ।
कुठें, बाइ, फेडीन मी ह्या अघास ॥ २ ॥

किती ताडिलें मी तिला कोंवळीतें ।
जसे गाइला निर्दयी गोवळी ते ॥
तिला मारिली पोळिली गांजली हो ।
अहा ! लाविली मी कुळा काजळी हो ॥ ३ ॥

अह्मी पाळितों नीट गोवत्सलातें ।
तरी कां हणीतों सुनांनांच लाथें ॥
गुरांहूनि कां नीच झाल्या मुली ह्या ।
नसे हो दया सासवानां मुळीं ह्या ॥ ४ ॥

करोनी गुन्हा मी तिला ऊरफाटें ।
छळीलें, स्मरोनीच तें ऊर फाटे ॥
प्रभो सन्मति दे सदा सासुनां ह्या ।
सुखें सासुरीं नित्य नांदू सुना ह्या ॥ ५ ॥

माझ्या त्या रडव्या मुलास दिधलें मी तीजपाशीं जरा ।
तेव्हां तें रडलें तरी मग बळें घे मी करोनी त्वरा ॥
मी तीतें वदलेंच निर्घृणपणें "आहाग चांडाळणी ।
घेशी कां चिमुटे मुलास, दिवटे, नाहीं दया डांकिणी ॥१८॥

सोनूल्या, कळ येउनी किति तरी होसी असा व्याकुळ ।
पंत्या लावुनिया खरेंच करटे त्वां शोभवीलें कुळ ॥
कृत्यें हीं विवशी करूनि रडशी नांवें कशा आइच्या ।
मारायास मुलांस पातलि, पुढें हो शर्थ झाली इच्या ॥ १९॥

येथें रोंवत राहसी जर अशी होतील कामें कशीं ।
तूझा धाडिल बाप काय गडि तो, जा चालतीहो कशी ॥
बाई, भंडविलेंस कांहिं तुजला नाहींच लज्जा मुळीं ।
जैशी खाण तशीच माति निघते, ऐशीच ह्यांची कुळीं' ॥२०॥

रोळी घेउनि एकदां करिं धुण्या मी जाइ तांदूळ ते ।
मार्गीं लागुनि ठेंच ती, मिसळली रोळीमधें धूळ ते ॥
तेव्हां मी न खडे मुळीं निवडितां तैसेच ते धूतले ।
आणोनी घरिं सत्वरीं मग तसे ते आधणीं वैरिले ॥ २१ ॥

जेवाया बसतां खडे वघुनियां बाळ्या विचारी मला ।
'आई, कोण असे बरें निवडिते आतांशि ह्या तांदुळा ?' ॥
बोलें मी 'मजला विचारुंहि नको, तूं आपुले बाइले ।
बाळ्या, पूस, अतांशिं ती निवडिते तांदूळ हे चांगले ॥२२॥

दांताच्या करुनी कण्या सतत मी सांगीतसें रे तिला ।
बाळ्याला असतेच खोडि निवडी तूं नीट गे रेतिला ॥
घेते तांदुळ ती पुढें परि खडे काढीत नाहीं अशी ।
नाचूं संतत पाठिशीं तरि कशी हीच्याच सांगे मशी' ॥२३॥

होतां जेवण हात मात्र धुवुनी आल्या तसा सांवळा ।
जावोनी पडवींत फार बडवी पोरास तो बावळा ॥
' नाहीं ऐकत आइचें ' ह्मणुनिया देईच टोशांसतो ।
होई हर्ष मला जसा अधिकतो वाळ्या तिला शासतो ॥२४॥

पोळीची भिजवीत मी कणिक ती होतें, परी पातळ ।
झाली ती मम हातुनी पडुनियां जास्ती जरासें जळ ॥
तेव्हां मी वदलें सुनेस ' मुलिगे, आणी डबा तो इथें ।
घाली नीट कणीक तूं अणिक गे थोडी परांतींत तें ' ॥२५॥

काढोनी मग ती फळीवरिल तो आणी डबा सत्वरी ।
ओतीतां परि पीठ मूटभरुनी सांडे जरा भूवरी ॥
तेव्हां जाउनि मस्तकीं तिडिक ती मी चांगलें हातिं तें ।
बाई ! कोलित लागलेंच धरुनी, मी डागलें हा ! तितें ॥२६॥

थोडासा अपराध मात्र असतां तो डांकिणीनें परी ।
मी मोठा करुनी सदैव छळिलें हो तीस वैऱ्यापरी ॥
बाई ! या रिति नित्य सत्य दिधली मी जाचणी तीस ती ।
नाहीं कांहिं परी कधींहि उलटें, हो बोलली ती सती ॥ २७ ॥

मी बोलें तिजला परंतु अपुलें ती काम सारें करी ।
संतापा न करून शांतमनसें माझी करी चाकरी ॥
तेव्हां येउनि राग, आग तनुची होइच माझी अती ।
बोलें मी मग अंतरीं भडकुनी, राही परी शांत ती ॥ २८ ॥

' निःशब्दें करुनी कसाइ करणी मानेस ही कापिते ।
बोलाया मज लावुनी अवदसा ही रक्त माझें पिते ॥
बोलावें तरि तोंड मात्र दिसतें, हीची कृती ना दिसे ।
ही ऐशी दिवटी निघूनि करटी लावी मला हें पिसें ' ॥ २९ ॥

आहे भाटि परंतु ओठि फुटतां खाद्या मिशा पांढऱ्या ।
अंगीं लोकर फार ती मृदु असे जैशा उशा गोजऱ्या ॥
कोठें लाल कुठेंच शुभ्र ठिपके देहीं जिच्या शोभले ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनिया मच्चित्त हें लोभलें ॥ २ ॥

जीचें शेंपुट लांब लाल मृदुसें रेशीम गोफापरी ।
रागानें परि ज्यास ती फुगवितां येते व्रशाची सरी ॥
जातां धांवतही जिची न कधिंही हीं वाजतीं पावलें ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनिया मच्चित्त हें लोभलें ॥ ३ ॥

पंजे शुभ्र जिचे असून वरतीं काळीं नखें भासतीं ।
जेवीं स्वच्छ शशांकबिम्बि दिसती ते डाग रम्याकृती ॥
पट्टा शुभ्र सुरेख भाळिं गमतो कीं गंध तें रेखिलें ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनिया मच्चित्त हें लोभलें ॥ ४ ॥

आणी दूध जधीं सकाळिं गवळी येई तदा धांवुनी ।
त्याचें भोंवतिं नाचुनीच, फिरुनी पायीं तनू घांसुनी ॥
म्यॉं म्यॉं ओरडुनी सुखें पय पिई जें भूवरी सांडलें ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनिया मच्चित्त हें लोभलें ॥ ५ ॥

येतां अंबररत्नबिम्ब उदया जाऊनि कौलावरी ।
घेवोनी नवमित्ररश्मि अपुल्या देहीं सुखानें वरी ॥
तेथें निर्मल सर्व अंग करिते जी चातुरी आपुलें ।
ऐशी साजरी **मांजरी** बघुनिया मच्चित्त हें लोभलें ॥ ६ ॥

जेवाया बसतां दुपारिं जलदी येऊनि पानापुढें ।
बैसे नीट सदा उगाच न पळे पंक्तींत चोंहोंकडे ॥
घालूं भूवरि भात खात नितका चित्राहुती ना गिळे ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनियां मच्चित्त हें लोभलें ॥ ७ ॥

आहे एक परंतु खोडि तिजला सोडी न तीतें जरा ॥
तूपावांण न भात खात कधिंहा कांहींहि तुझीं करा ॥
भाताच्यावर तूप नाहिं तर जी राही उपाशी बळें ॥
ऐशी साजरि **मांजरी** बघुनियां मच्चित्त हें लोभलें ॥ ८ ॥

होतां भोजन अंगणीं मग तनू टाकी भली आडवी ।
डोळे झांकुनि शांत निश्चलमनें चारी पदां लांबवी ॥
साधूनीच समाधि साधुस अशी मागें जिनें टाकिलें ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनिया मच्चित्त हें लोभलें ॥ ९ ॥

ऐशी घेउनियां जरा सुखकरा जी नित्य विश्रांतिला ।
डोळ्यांतें उघडी पदांस अखडी सोडीच भूमीतला ॥
देई जांभइ जी उठूनि तनुला देवोनि आळे पिळे ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनिया मच्चित्त हें लोभलें ॥ १० ॥

पाहें अंगणिं बैसली चिमणि जी घाली झणीं झांपडी ।
जातां ती उडुनी हताश बनुनी बैसे धरूनी दडी ॥
लावी निश्चल अंगणीं टक, जिचें क्रोधें मन क्षोभलें ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनिया मच्चित्त हें लोभलें ॥ ११ ॥

येतां ती चिमणी पुन्हां उचलते, जी मागले पाय ते ।
घेई भार पुढील पायिंच उडी जी नेमकी मारिते ॥
जातां भक्ष्य परी उडून करिते जी तोंड हिर्मुसलें ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनियां मच्चित्त हें लोभलें ॥ १२ ॥

केव्हां पायिं पुढील शेंपुट धरी चावी स्वदन्ताङ्कुरें ।
येतां ती कळ सोडि त्या गरगरा नाचे फिरे गुर्गुरे ॥
भूमीतें खरडी नखांनि अपुल्या मध्येंच जोरें पळे ।
ऐशी साजरि **मांजरी** बघुनियां मच्चित्त हें लोभलें ॥ १३ ॥

उक्ती कृती माधिं न दावुनि कांहिं मेळ ।
तुह्मीं सदा करुनिया बहु पोरखेळ ॥
घेतां करूनि तरि काय हंसें सदा हें ।
पाहूनि ह्यास मम मानस नित्य दाहे ॥ ९ ॥

घेऊनि बाजु तुह्मि त्या गतभर्तृकांची ।
ही रेलचेल करितां "मुख मौक्तिकांची" ॥
माघार घेउनि सदा परि योग्य काळीं ।
कां कीर्ति ही पसरितां जगतांत काळी ॥ १० ॥

चाहा स्वतां पिउनिया तुह्मि 'माधवाचा' ।
आरोप **कर्मठ**जनीं करितां तयाचा ॥
सत्या त्यजून उगि माजवितां दुहीतें ।
वाढीवितां सुपथ्य पाजुनि कां अहीतें ॥ ११ ॥

दोषांस त्या न अपुले करुनी इलाज ।
अन्यांस बोध करितां, कशि नाहिं लाज ॥
चोरावरी उलट मारुनि नित्य बोंबा ।
कां लावितां फुकट हा जगिं सत्य-टेंभा ॥ १२ ॥

लागूंल हालवुनिया परकी जनांशीं ।
चांगूलता विसरतां निज बांधवांशीं ॥
सोडूनि आपपण पाप शिरीं कशाला ।
घेवोनिया, उजळितां जगतीं मशाला ॥ १३ ॥

कां भांडणीं उचलुनी तरि हा विडाच ।
देतां असा **जनानिला** मज थोर डाच ॥
त्या यादवीस तरि देवुनिया न फूस ।
तुह्मीं झटा हटविण्या अपुल्या रिपूंस ॥ १४ ॥

---

# अगदींच नवीन !

## सासूची जबानी.

महासद्गुणी रूपखाणी विनीता ।
अशी सून होती सती जेविं सीता ॥
छळीलें परी तीस मी कैकईनें ।
तिचे हाल केले अहा ! कैक ईनें ॥ १ ॥

धरूनीं मनीं बाइ, दुर्वासनेला ।
छळीलेंच मी सद्गुणी त्या सुनेला ॥
सुखें तीस खाऊं दिला नाहिं घास ।
कुठें, बाइ, फेडीन मी ह्या अघास ॥ २ ॥

किती ताडिलें मी तिला कोंबळीतें ।
जसे गाइला निर्दयी गोंवळी ते ॥
तिला मारिली पोळिली गांजली हो ।
अहा ! लाविली मी कुळा काजळी हो ॥ ३ ॥

अह्मी पाळितों नीट गोवत्सलातें ।
तरी कां हणीतों सुनांनांच लाथें ॥
गुरांहूनि कां नीच झाल्या मुली ह्या ।
नसे हो दया सासवानां मुळीं ह्या ॥ ४ ॥

करोनी गुन्हा मी तिला ऊरफाटें ।
छळीलें, स्मरोनीच तें ऊर फाटे ॥
प्रभो सन्मति दे सदा सासुनां ह्या ।
सुखें सासुरीं नित्य नांदू सुना ह्या ॥ ५ ॥

उर्फी कृर्नी मधिं न दावुनि कांहिं मेळ ।
तुह्मीं सदा करुनिया बहु पोरखेळ ॥
घेतां करूनि तरि काय हंसें सदा हें ।
पाहूनि ह्यास मम मानस नित्य दाहे ॥ ९ ॥

घेऊनि वाजु तुह्मि त्या गतभर्तृकांची ।
ही रेलचेल करितां "मुख मौक्तिकांची" ॥
माघार घेउनि सदा परि योग्य काळीं ।
कां कीर्ति ही पसरितां जगतांत काळी ॥ १० ॥

चाहा स्वतां पिउनिया तुह्मि 'माधवाचा' ।
आरोप कर्मठजनीं करितां तयाचा ॥
सत्या त्यजून जगि माजवितां दुहीतें ।
वाढीवितां सुपय पाजुनि कां अहीतें ॥ ११ ॥

दोषांस त्या न अपुले करुनी इलाज ।
अन्यांस बोध करितां, कशि नाहिं लाज ॥
चोरा परी उलट मारुनि नित्य बोंबा ।
कां लावितां फुकट हा जगिं सत्य-टेंभा ॥ १२ ॥

लांगूल हालवुनिया परकी जनांशीं ।
चांगूलता विसरतां निज बांधवांशीं ॥
सोडूनि आपपण पाप शिरीं कशाला ।
घेवोनिया, उजळितां जगतीं मशाला ॥ १३ ॥

कां भांडणीं उचलुनी तरि हा विडाच ।
देतां असा जननिला मज थोर डाच ॥
त्या यादवीस तरि देवुनिया न फूस ।
तुह्मी सदा हटविण्या अपुल्या रिपूंस ॥ १४ ॥

## ढोंगी बोवा.

नरा संतवेशा कशा व्यर्थ घेशी ।
मनीं राहते ही तुझ्या पापराशी ॥
कशा लाविशी भस्म हें भाळ गाला ।
कृतीनें अशा वंचवीशी जगाला ॥ १ ॥

न अंघोळ ही घोळ वाटे मनाला ।
मनःशुद्धिशक्ती नसे जीवनाला ॥
सुबुद्धी करी ती सदा चित्त शुद्धी ।
न होईल ढोंगें कधीं कार्यसिद्धी ॥ २ ॥

भले घालिशी थोर रुद्राक्ष कानीं ।
शिरीं ठेविले सन्मणी तक्षकांनीं ॥
परी अंतरीं राग हा नित्य नाचे ।
उमाळेहि येतात दुष्कल्पनांचे ॥ ३ ॥

अरे लाल वस्त्रांस घेशी कशाला ।
हरीची सरी येत नाहीं सशाला ॥
वरी दाविशी फार सौजन्य वाणें ।
परी कां न चित्तीं तुझ्या भक्ति बाणे ॥ ४ ॥

करीं तूं धरीशी भला लांब दंड ।
परी कामकादूर चित्तीं उदंड ॥
उपायें न लाभे अशा देवराव ।
मनीं सत्य तत्वास द्या देइ ठाव ॥ ५ ॥

२

तरी होउनीया जरासा विचारी ।
मना आपुल्या शांतवृत्तीं विचारी ॥
फसे देव कां तो अशा ह्या कृतीला ।
बघे तो मनाला नच स्वाकृतीला ॥ ६ ॥

वधी तूं अधीं आपुले षड्रिपू जी ।
पुढें ईश्वरा भक्तिभावेंच पूजी ॥
करी स्वच्छ चित्ता, हरी पापसत्ता ।
धरी सज्जनांचा तरी हा सुकित्ता ॥ ७ ॥

रिपू राग जो सद्गुणा जाळि खाक ।
शरीरीं तयाची सदा लावि राख ॥
फिरे अंतरी सर्वदां लोभवारा ।
तया वार आधींच मूढा गव्हारा ॥ ८ ॥

सदा चित्त इच्छी तुझें कामरंग ।
तसे माजती वासनेचे तरंग ॥
तरी हांकली आधिं दुष्ट स्मरा या ।
पुढें लाग ईशांघ्रिपद्मा स्मराया ॥ ९ ॥

मन ग्रासिलेंसे तुझें मत्सरानें ।
कुबुद्धीचिं हीं वाढलीं मस्त रानें ॥
करीती तया काय तूझ्या खडावा ।
मनीं काढ त्याचा वरें तूं अढावा ॥ १० ॥

नको वागुं तूं वांकडा वा पराशीं ।
त्वरें निर्दळी मातली पापराशी ॥
खला दुर्महंता वधूनी अहंता ।
करी शांत चित्ता भजे दुष्टहंता ॥ ११ ॥

परस्त्रीकडे वांकडे दृष्टिनें तूं ।
कसें पाहुनी लाविशी पापकेतू ॥
धरीशी कसी मानसीं वासना ही ।
तिनें लाभतें सौख्य जीवास नाहीं ॥ १२ ॥

परब्रह्मिं लावीं खरी एक निष्ठा ।
नको ठेवुं चित्तीं सुखेच्छा कनिष्ठा ॥
गळीं वागवीशी स्फटीकाक्षमाला ।
मनीं माजवीशी तरी कां तमाला ॥ १३ ॥

जटाभार शृंगार हा मस्तकाला ।
मनीं मांडितो स्वार्थ हा मस्त काला ॥
तरी जाणशी केविं वैकुंठरावा ।
प्रभूशीं सुभक्त्याच आत्मा ठरावा ॥ १४ ॥

न भक्तीविणें कार्य कांहीं निभावे ।
हरी बद्ध होईल सद्भक्ति भावें ॥
सुभक्तार्थ कार्यीं सदा चाकरी ती ।
हरीची खरीही असे एक रीती ॥ १५ ॥

धना पाहुनी घोंटिशी काय लाळ ।
तुला आवडे बाफिचा तो सुकाळ ॥
कुणी वाहिला ना तुला द्रव्यकोश ।
हरी नाम घेशी तरी तूं सरोष ॥ १६ ॥

अशीं वर्तनें शोभतातीं न संता ।
नरा तीं न नेतीं कधीं मुक्तिपंथा ॥
जरी प्रीति, भक्ती, सुबुद्धी रहातीं ।
हरी तो धरीतो तरी संत हातीं ॥ १७ ॥

# खाणावळ.

जावोनी घनधूम्र पूर्ण सदनीं, आहे किती मंडळी ।
पाहोनी, मग साधणें जरि असे जागा तिथें मोकळी ॥
जागा नाहिं तरी क्षुधा दमवुनी बाहेर हो तिष्ठणें ।
धूमानें नयनांबु पाडुनि मुखा स्नानास त्या घालणें ॥१॥

होतांच **जागा** मग मोकळी ती ।
आनंदवीची हृदिं थोर येती ॥
ज्या वस्तु कष्टें जगिं साध्य होती ।
ये मूल्य त्यांनां अशि लोक रीती ॥ २ ॥

काढुनीच वसनें मग सारीं ।
झाडुनीच नयनांतिल वारी ॥
बांधुनी त्वरित शेंडि करानें ।
पाय मोरिंत धुण्यास्तव जाणें ॥ ३ ॥

करामध्यें **तांब्या** कळकट असा घेउनि तधीं ।
भरावा तो **पिंपीं** खचित गमतें जें मळनिधी ॥
पदा ठेवोनीया बुळबुळितशा मोरिंत ह्मणी ।
जलातें ओतावें; मग तुडविणें शेण चरणीं ॥ ४ ॥

पुसाया पायाला कधिं न फडका तेथ मिळणें ।
तरी ओल्या पायीं तिथिल **मुकटा** हातिं धरणें ॥
धुराला त्रासोनी बहुत वदना कृष्ण करुनी ।
बिचारा खुंटीला सतत असतो हा लटकुनी ॥ ५ ॥

त्वदंगावरी सांचलें बोट कीट ।
तुला येतसेल स्वतांलाच वीट ॥
बिचाऱ्या तुला चार मासांत कांहीं ।
अजाऱ्या परी वाटतें स्नान नाहीं ॥ ६ ॥

गेली ही तव अंगकांति फिरुनी धूम्रें चुलीच्या किती ।
पाण्याची तुजशीं कधीं न घडते वाटे मला संगती ॥
दुर्गंधी तनुला तुझ्या बहुत ये, देवा नको ही स्थिती ।
दैवाच्या वरि भार ठेवि तुज बा नाहींच अन्या गती ॥७॥

असें त्वज्जिणें हें जरी सत्य खोटें ।
तरी एक आहे तुझें भाग्य मोठें ॥
तुला स्पर्शती होउनी स्वच्छ सारे ।
जगीं लोक हें चित्र आहे कितीरे ॥ ८ ॥

असो, नेसोनीया त्वरित **मुकटा** हा झटकुनी ।
बसावें पाटाच्या वरति पदयुग्मा अखडुनी ॥
पुढें आतां ताटीं ठरिव परिचें अन्न पडतें ।
जयातें पाहोनी त्वरित अवघी भूक निवते ॥ ९ ॥

जो नेसे तोकडासा मलमय मुकटा सर्वदाही सुखानें ।
ठेवी तंबाकुची जो सतत मुखिं बुकी चोळुनीया करानें ॥
ज्याच्या त्या जानव्याला बसुनि मळपुटें रूप ये चामड्याचें ।
ऐसा ये **वाढपी** हा किळस बहुत ये पाहुनी रूप याचें ॥ १० ॥

धरी हा तमाखू मुखीं सर्वदाही ।
मुखा घाण तेणें सदा येत राही ॥
तमाखूमुळें ओठ हे कृष्ण होती ।
अहा ! त्यामुळें शोभते काय मूर्ती ॥ ११ ॥

क्षणभर झणिं दावी **नासिकामौक्तिकांनां** ।
झडकरि परि नेई भीतिनें आंत त्यांना ॥
परि कधिं कधिं हातीं चोरुनी घेउनीया ।
लपविच मुकव्याच्या आंत त्यां ठेवुनीया ॥ १२ ॥

सोसोनि ताप बहु घेउनि धूम्र देहीं ।
सेवोनि राख तनुची जधिं होइ लाही ॥
तेव्हां न वारि मिळुनी बनुनी तृषार्त ।
हा घर्मबिंदु **मुकटा** असतो गिळीत ॥ १३ ॥

पुढें दिसत **भात** हा चव नसे जयाला मुळीं ।
तयांत बहु शोभते कठिणशा खड्यांची कुळी ॥
तशी चमकतीं कितीं तरिच भातखंडें अहा ।
असे सकल भोजनीं प्रमुखसा असा **भात** हा ॥१४॥

भातावरी **वरण** हें पिंवळेंच आहे ।
हा त्यांत डोळ दिसतो घनकृष्ण पाहे ॥
हें थोडके करपले बुडिं डाळदाणे ।
त्यांच्या महापरिमळें गृह हें दणाणें ॥ १५ ॥

रत्नाकरोदरिं जशीं बहुमूल्य रत्नें ।
हातास लागति सदैव अनंत यत्नें ॥
तैशा बुड्या बहुत **आमटि**च्या बुडाशीं ।
मारोनियां मिळविणें तुरिच्या कणाशीं ॥ १६ ॥

ती भोजनास असणार सदैव **भाजी** ॥
सुस्वस्त मार्किटमधें मिळते सदा जी ॥
ते सर्वदा तिखट तींस जरा करीती ॥
तेणें करुनि मग थोडकिशी खपे ती ॥ १७ ॥

पुढें **घरधनीण** ये त्वरित तूप वाढावया ।
करांत **चमचा जुना** कढत वाटि घेवोनिया ॥
**उभाच** चमचा करीं पडती थेंब भातावरी ।
अधीक पडती तरी मनिं बने बहू घाबरी ॥ १८ ॥

पुढें येई **पोळी** पदर तिजला तो नच मुळीं ।
दिसे मध्यें काळी परि हिरवि ती कांठिं सगळी ॥
अशी पोळी खातां तनुस विकृति खास जडते ।
परी तीतें खाणें, शिव शिव ! सदा भाग पडतें ॥१९॥

अखेरी ये भातावरि विमल तें **तक्रच** अतां ।
जयाचे अंगीं ती सतत वसते शुभ्र जलता ॥
अशा ताकीं भाता मिसळुनि अह्मी त्या भुरकितों ।
तरी सांगा कैसा सुदृढ अमुचा देह बनतो ॥ २० ॥

अर्पी मी अन्नपूर्णे तव पदकमलीं अल्प यत्नास भावें ॥
जोडोनी हस्तयुग्मा विनतिस करितों पूर्ण तीतें करावें ॥
माते ! खाणावळीचा धनि सुमति बनो लोभ नाशास जावो॥
विद्यार्थ्यांच्या सुदैवें मधुर सुरसें अन्न त्यां प्राप्त होवो॥२१॥

---

## महाराष्ट्राची सद्यःस्थिति.

भाले तीक्ष्ण भले, सिता असिलता, गुप्ती सुती गोफणी ।
बंदूका, खरधार तीर परशू घेवोनि युद्धांगणीं ॥
क्रीडाया रणधीर वीरमणि ते होते जिथें उत्सुक ।
तेथें हे जन हेलपाटि करिती काय स्थिती घातुक ॥ १ ॥

प्रतापाचे ठेवे, समर-जय-चिन्हें सुविषद ।
ध्वजस्वातंत्र्याचे, प्रबलरिपुदुर्भेद्य, सुखद ॥
असे जेथें होते विलसत मनोहारक गड ।
तिथें आतां दृष्टी पडति नुसते हाय ! दगड ॥ २ ॥

जेथें पूर्वी द्विप मदभरें शोभले डोलतांना ।
तेथें आतां स्थळ मिळत हें हाय ! वन्या लतांना ॥
जेथें होते उखळित खुरें भूमितें मत्त वाजी ।
तेथें हिंडे अशुभतर ती हाय ! आजी शिवा जी ॥ ३ ॥

प्रसूनामोदानें, फलित तरुनीं, मंद पवनें ।
जिथें होतीं घ्राणेंक्षण सुखकरें तीं उपवनें ॥
स्मशानें हीं तेथें दिसति फिरती दुष्ट तरस ।
अशाकृत्यें काला ! करसि किति चित्तास विरस ॥ ४ ॥

कर्तव्या अपुल्या करूनि कुणबी मानूनि आनंद ते ।
दारीं चार गुरांस राखुनि सदा होते जिथें नांदते ॥
तेथें हा कृषिकर्मवर्ग अधुना सोडूनि ढोरें गुरें ।
राहे अर्ध उपाशिं कारण कराखालीं विचारा चुरे ॥ ५ ॥

रानावनांत फिरुनी चरुनी समस्त ।
होतीं गुरें बहुत जेथ सतेज मस्त ॥
आतां तिथेंच मिळुनी न मुळीं चराया ।
तेजस्विता गळुनि ये कृशता गुरां या ॥ ६ ॥

संपत्तिनें जो असुनी कुबेर ।
केलें जयें शत्रुस जेर जेर ॥
तो देश आतां शिरिं कर्जभारा ।
वाहूनि जाई थकुनी विचारा ॥ ७ ॥

लावीले अटकेस आर्यपटके ज्यानीं महा कौतुकें ।
मोडीलीं घटकेंत शत्रुकटकें, ज्याशीं न कोणी टिके ॥
त्यांचे वंशज आजकाल बसती होवोनि निःसत्व हे ।
घेती कंदुक बंदुक त्यजुनि ते हातीं, कसें हें सहे ॥ ८ ॥

जेथें होते सुमति सुकृती निस्तुल न्यायशास्त्री ।
वेदज्ञानी सुजनमणि ते निस्पृही रामशास्त्री ॥
तेथें हांजी करुनि भरती लोक निर्लज्ज पोटें ।
दाटे कंठ स्थिति बघुनि ही हाय हा ऊर फाटे ॥ ९ ॥

भोगोनि सर्व परिभोगभरा सदाही ।
लाभोनि इष्ट सुख गोष्टिंस सर्व काही ॥
होते भले सतत नांदत जे महालीं ।
कंठीति ते जन अतां दिन फार हालीं ॥ १० ॥

ज्यांना मराठाजन सर्व गाई ।
होत्या अशा त्या सुखि जेथ गाई ॥
तेथें अतां कापिति त्यां कसाई ।
तेंही महाराष्ट्र निमूट साही ॥ ११ ॥

उत्साह साहस बल स्वजनाभिमान ।
होते असे सुगुण ज्या जनिं मूर्तिमान ॥
त्यांच्या उरीं खर सुरी परतंत्रतेची ।
आजी शिरुनिच परोपरि त्यांस जाची ॥ १२ ॥

---

# शिमगा.

अहा लज्जा आणी नयमधुर हिंदूस **शिमगा** ।
अनीतीच्यामध्यें इतर न सणीं त्यास सम गा ॥
करोनी दुष्कृत्यें विसरुनि मनुष्यत्व बरवें ।
पशुत्वातें जाती नर वदुनि वाक्यें कटु रवें ॥ १ ॥

**दिवाळीचा** कोठें सुखद हृदयाल्हादि सण तो ।
पुढें त्याच्या सांगा अनय शिमगा केंवि गणतो ॥
कुठें भक्तीयुक्ता द्युमणिकुलसद्रत्ननवमी ।
कुठें हा होळीचा सण जयिं पशुत्वास न कमी ॥ २ ॥

कुठें हर्षोत्कर्षी नयमय मनोरम्य **दसरा** ।
कुठें हा होळीचा सण उधळि जो केरकचरा ॥
**गणेशाचा** कोठें दिवस सकलां सौख्यकर तो ।
कुठें हा होळीचा सण मलिन जो चित्त करतो ॥ ३ ॥

सणीं ह्या कोणीही वचन कटु अश्लील लिहिता ।
तया देती माना जणुं करितसे तो बहु हिता ॥
करी चोरी मारी तरि कुणि न दे दूषण कधीं ।
परी देती त्यानें उलट कुणि उत्तेजन कुधीं ॥ ४ ॥

शरीरीं ही धूळी उधळुनि पशुप्राय बनती ।
त्यजोनीया लज्जा सकल तनु शेणांत भरती ॥
विचारा सारोनि व्यसनिं पडुनी दुःख वरिती ।
किती नाना रीती दुरित करिती निंद्य ठरती ॥ ५ ॥

समाजामध्यें जो नर मिरवितो थोर पदवी ।
मुलांबाळांना तो वचन कटु बीभत्स पढवी ॥
त्यजोनी तो नीती सुविमल मती फार मळवी ।
दुराचारा थारा करुनि सुगुणग्राम पळवी ॥ ६ ॥

तमाशीं ह्या नाशी अमित धनराशी लघुमती ।
तशीं वाक्यें कानीं कुटिल कटु दुःशील घुमती ॥
कुणी मोठे मोठे हलकट जनीं ह्या मिसळुनी ।
धना माना लत्ता हणति नयनीती विसरुनी ॥ ७ ॥

अफू दारू घोंटा पिउनि किति तोटा करिति हे ।
करूनीया पापा जगिं निरयतापा वरिति हे ॥
शिशूंनां दुष्कर्में वडिलहि निजांगें शिकविती ।
भला कित्ता आहे ! वडिल न, रिपू हे मलमती ॥ ८ ॥

अतां सुज्ञानों मी विनविं करयुग्मास जुळुनी ।
चला टाकूं ऐशा मलिन कडु चालीस खुडुनी ॥
सदा नीति, प्रीती, विनय धरुनी सौख्य वरुंया ।
सुशब्दा उच्चारूं सण ह्मणुनि आनंद करुंया ॥ ९ ॥

---

## भिक्षुक.

जोडोनी कर नम्र होउनि, तुला मी प्रार्थितों विप्र भो ।
ऐसा भिक्षुकजन्म हा पुनरपी मातें न दावि, प्रभो ॥
सोहाळे सगळे भले बघितले, आतां किती तापुरे ।
कांहीं हौस नुरे, अरे, मन मुरे, हें सौख्य आतां पुरे ॥१॥

वाजेतों अकरां उपाशि पुढिची पाहोनियां वाट ती ।
ये आमंत्रण तें तरी हृदिं अती हर्षोर्मि ह्या दाटती ॥
पत्नीपुत्रसुतास्नुषांस अमुच्या कोणी जरी बोलवी ।
होई मोद तरी भला न गमला जो पुत्रजन्मोत्सवीं ॥ २ ॥

येतीं ना जर तीं कधीं अगदिंही आह्मांस आमंत्रणें ।
क्षोभे कोप तरी मनीं जणुं वनीं दावाग्निशुष्कें तृणें ॥
पायातें हपटून फार भिवयां आणोनियां वांक तो ।
कष्टानें कथितों घरांत करण्या आह्मी स्वयंपाक तो ॥ ३ ॥

एखादे दिवशीं उशीर उठण्या झाला अह्माला जरी ।
दावोनी तरि धोंडभट्टि करितों आह्मी तनू साजरी ॥
अंघोळी न करूनि, नेसुनि नवा पंचा भला सोंवळा ।
भाळा लावुनि वर्तुळाकृति टिळा, माळा गळां सोज्वळा ॥४॥

रुद्राक्ष श्रवणीं मणी अहिशिरीं जैसे तसे शोभती ।
देहीं घस्मर भस्मपुंड्र दिसती तेणें मनें लोभतीं ॥
जाडी दर्भजुडी, वडी तबकडी, झारी करीं साजरी ।
खांदीं तें फडकें, जुनें उपरणें, स्वारी सजे यापरी ॥ ५ ॥

रीतीनें असले, वळें बनवुनी भोळी भली आकृती ।
लोकां वंचवुनी धना मिळवितों दावोनि खोटया कृती ॥
ठेवीतों यजमान–मानस सदा संतृप्त, त्यांची स्तुती ।
गातों नित्य, अह्मा तिच्याविण मिळे न स्वल्पही वस्तु ती ॥६॥

नीचत्वास धरून, लाथ हणुनी मानापमानास ती ।
कृत्यें नित्य करून विप्रकुळिला जी काळिमा फांसती ॥
स्वीकारूनिच दास्य, आस्य बहुधा वेंगाडुनी आपलें ।
कष्टानें यजमान तुष्ट करितों आह्मावरी तापले ॥ ७ ॥

त्यांचा घेउनियां सहर्ष मुलगा जो शेंबडालेंबडा ।
त्यातें खेळवितों वदूनि कुतुकें “ लुच्चा असे हा वडा ” ॥
येतो फार जरी मनीं किळस तो घेतों तयाचा मुका ।
**पैसा** मोहक हा अनेक करितो लोकीं सदा कौतुका॥८॥

आह्मी दाखवितों अनन्य ममता या रीतिं पुत्रास ती ”
होवोनी यजमान शान्त, न अती आह्मांवरी त्रासती ॥
जातों घेउन त्या मुलास, बसती जेथें सदैव स्त्रिया ।
कां कीं डाळ शिजून तेथ पचती खोटयाहि विप्रक्रिया ॥९॥

आह्मी खेळवुनी मुलां, दवडितों तेथें सदा वेळ ती ।
हांसूनी वदुनी “ अह्मास रुचतीं ऐशीं मुलें खेळतीं ॥
काढा रात्रिस दृष्ट, काकु, करि हा लुच्चा मजा फार ती ’
उक्तीनें असल्या सती न जगतीं सांगा किती भारती॥१०॥

भोळ्या, शिक्षणहीन, धार्मिक, सती सत्यव्रता सन्मती । ॥
दानें, नेम, जपव्रतादि करण्या ज्या वाटती जन्मती ॥
त्या स्त्रींना फसवूनि वित्त बहुधा आह्मांस तें लाभतें ।
वेदज्ञानि जगांत गाजुनि अह्मी दाखवितों दंभ तें ॥ ११ ॥

दोन्ही पक्ष जरी ‘ **कमीशन** ’ अह्मा देती वरेंसें तरी ।
लग्नाची करितों सदा जुळवणी हर्षोनियां अंतरीं ॥
जावो तो नवरा, मरो नवरि ती, आह्मा जरी तें धन ।
लाभे पुष्कळ, आणितों तरि कधीं लग्नामधीं बाध न ॥१२॥

पक्वान्नें करुनी घृताचि भरुनी जे ठेविती वाटि ती ।
**दानें** पुष्कळ, **दक्षणा** बहु धना आह्मांस जे वांटिती ॥
आह्मीं त्या स्तवितों सहर्ष पुजितों मानोनि देवापरी ।
हाहा! टाकुनि सत्यरत्न वरितों मिथ्योक्तिची खापरी ॥१३॥

मांडे, पाटवडे, वडे, अनरसे, श्रीखंड, लाडू दळे, ।
बासुंदी, जिलबी बघूनि अमुची जिव्हा सदा ही चळे ॥
चाटोनी चटणी, भजीं, अमृत तें, कोशिंबिरी, रायतें ।
आशीर्वाद सदैव हृष्टमनसें देतों अह्मी आयते ॥ १४ ॥

घालीतां मुखिं भाजि भाजि चटका देवोनियां तोंड तें ।
तैशी आमटि लावुनीच ठसका श्वासास ती कोंडते ॥
लाडूंनीं जरि ह्या निगोड सगळा आनंद तो भंगला ।
पाहोनी तरि **दक्षणेस** वदतों " स्वैंपाक हा चांगला " ॥१५॥

पैशाची तरि रास खास मिळते येतां **चतुर्मास** ते ।
पक्वान्नें बहुमिष्ट भक्षुनि चढे अंगावरी मांस तें ॥
पुण्यार्थी **विधवा** अह्मांस विभवा देतात भावें महा ।
त्यांनाही फसवावयास करितों आह्मी अहा ! नेम हा ॥ १६ ॥

आजारी यजमान होतिल जरी त्यांचे घरीं सत्वरी ।
जावोनी कथितों तरी "**ग्रह** करी पीडा तुह्मांला खरी ॥
साडेसाति असेच, शांति करवा तीं अन्नदानें करा" ।
ऐसा बोध करूनि, पोट भरुनी देतों सुखें ढेंकरा ॥ १७ ॥

आह्मां बांधव सोयराच गमतो तो सर्वभक्षी **यम** ।
कां कीं गाजुनि तत्प्रताप मिळतीं दानें धनें कायम ॥
जोडे, वस्त्र, सुपात्र, छत्र मिळतें धेनू कधीं दूभती ।
वर्षश्राद्धि तशा किती मिळकती आह्मां बऱ्या लाभती ॥ १८ ॥

येतां तीं **पितरें** समूळ उतरे ती काळजी आमुची ।
येतीं त्या समयीं अह्मा बहुत तीं आमंत्रणें रोजचीं ॥
तेव्हां होउनि पारणें जड बडे तें दक्षणेंचें, जनां ।
गांजीतें अमुचें, असे गरजु जो त्याचें पडे तेज ना ॥ १९ ॥

रूढीनें स्वमनें कुडीं बनवुनी बोलोनियां पुष्कळ ।
धर्माचे नच तत्त्व जाणुनि कधीं होतों अतां बाष्कळ ॥
अर्थावांचुनी **पोपटा**परि सदा हे मंत्र उच्चारतों ।
चाली घातक राखुनी सततही तोंडास या चारितों ॥ २० ॥

धर्माचे अधिकारि भूसुर अह्मी पापें करूं लागतों ।
पोटासाठिं करूनि लोंचटपणा लोकीं अतां भागतों ॥
ढोंगें दावुनि हांजि हांजि करुनी ये जीव मेटाकुटी ।
जन्माहूनि अशा बरी मज गमे रानीं **मुनीची कुटी** ॥२१॥

* * * *

---

## फडें एडिटर.

होतों मीं अगदींच मूढ मज ना कोणी पुसे जेधवां, ।
धंदा काय करूं विचार मजला झाला असा तेधवां ॥
शाळेंतील बुकें शिवाय करुनी ना वाचिलें अक्षर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १ ॥

जंगी **पत्र** निघे, अहा फडकती त्या जाहिराती किती ।
बक्षीसें बहु, लग्नफंडकवुली, तैसाच मृत्युप्रती ॥
आले वर्गणिदार ते झपझपां झाले हजारांवर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ २ ॥

झाला तो मज लाभकारक तदा जिल्हाच **रत्नागिरी** ।
छापाया मज जाहिराति मिळती तेथोनि नानापरी ॥
**वैद्यांचा** जणुं वाटतो मज खरा तो प्रांत रत्नाकर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ ३ ॥

वाटे कीं मज **काव्यकार** सगळे आले खरे घाइस, ।
तैसा पार नसे, अहा अगदिं तो, **काळीनिळी** शाइस ॥
किंवा **मासिकपुस्तकें** करितिं कीं ती तार सर्वांवर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ ४ ॥

**सिंगरच्या मशिनी** दिल्या घुसडुनी, तैशी **विमा** कुंपनी ।
**जी. बी. नाइक** मंडळीस दिधली जागाच सन्मानुनी ॥
बाकीचा तरि व्यापणें मग उरे तो भाग अन्यांवर !
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ ५ ॥

अर्धे म्यां भरिलें अशाच रितिनें तें पत्र **शंखध्वनी** ।
होतों **शालक विष्णुचा** म्हणुनियां बाकी निघे ना ध्वनी ॥
म्यालों ना मुदलींच मी मज सुचे जुक्ती तदा सत्वर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ ६ ॥

पत्राचा व्यवहार ना यदि मिळे त्या 'कॉलमा' व्यापण्या ।
नाहीं मी चुकलों नवा बनवुनी त्यातें तयीं छापण्या ॥
माझी त्यावर खालतीं झळकते टीका बरी खंबिर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ ७ ॥

टाइम्सादिक इंग्रजी असति जीं पत्रें तयां घेउन ।
त्यांचे **लीडर** जेमतेम अमुच्या पत्रीं दिले टेवुन ॥
कानातें अह ! लागतें कितितरी तें गोड भाषांतर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ ८ ॥

घेई पोलिस कोरटीं निशिदिनीं **केसी** सदा बाष्कळ ।
तारेंतील तशा मधें दपटिल्या त्या बातम्या पुष्कळ ॥
तारामास्तर **हटरास** अमुचा तो नेमिला तत्पर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ ९ ॥

कोणाचें कुठलें कसें तरी असो **व्याख्यान** मीं छापिलें ।
व्यापाऱ्यांस सदा गमे ह्मणुनियां **बाजारभाव** दिलें ॥
कांहीं अद्‌भुत जाहल्या तर दिल्या त्या वातम्या नंतर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १० ॥

कोणीही जरि **मृत्युच्या** मुखिं पडे तो चोर वा थोर वा ।
दोषांतें छपवोनि नित्य लिहिलें त्याच्या खऱ्या गौरवा ॥
लेलावें, किति टेंडरें, नवनव्या त्या नोटिशींच्या वर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ ११ ॥

वाचोनी कधिं पाहिल्याविण सदा तें पूर्ण हो **पुस्तक** ।
देई मी **मत** आपुलें, दुखविलें केव्हां न म्यां मस्तक ॥
माजी ती करडी असे नजर कीं त्या **ग्रंथकर्त्यांवर** ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १२ ॥

कांहींना मज **राजकीय** समजे बाबी, अहा, त्यांवरी ।
**टीका,** धोरण पाहुनी जनसमूहाचें, सदा मी करीं ॥
पत्रें घेऊनि दोन तीन अथवा त्यांतील गप्फांवर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १३ ॥

नाहीं केवळ मी **सुधारक** तसा किंवा जुना **कर्मठ** ।
त्यायोगें मजफावलें खरडण्या वाटेल तें वात्रट ॥
दोन्ही पक्ष **समान मूर्ख** ठरवीं निंदोनि भाराभर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १४ ॥

**धर्मीचें** जरि नांव तें मज नसे होवोनियां धार्मिक ।
तत्वें मी घुसळोनि काढित असें जीं वाटलीं मार्मिक ॥
देवोनी बहुशा **शिव्या मिशनरी** लोकांस तोंडावर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १५ ॥

नाहीं वेळ मला जरा कधिं मिळे कोणाशिं बोलावया ।
माझें तें मत पाहती किति तरी ऐकोनि झेलावया ॥
झाली कीं जर ती **सभा** मिळतसे जागा पुढें सत्वर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १६ ॥

यां, या, या वदती, सदा हलविती माझ्या करा घेउनी ।
देती हांसत मान पान खुरची, तसें विडी देउनी ॥
**पत्रा**तें स्तविती, नमूनि ह्मणती–आभार दीनावर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १७ ॥

जावें नाटक पाहण्या **फुकट**च्या देती टिकीटी मला ।
आशा कीं मत चांगलें मम मिळो पत्रांत तें त्यांजला ॥
सेवा ही कधिं थोर लोक करिती माझी जणूं किंकर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १८ ॥

येती मित्र किती मला रमविण्या वा रोज भेटावया ।
वाटे त्यां मिळती इथें **मुफत**चीं पत्रेंच वाचावया ॥
माझा तो कल पाहुनी वदति ते देती किती आदर ।
केला म्यां मग कार्यभाग अपुला होवोनि **एडीटर** ॥ १९ ॥

नाहीं **सर्वहि पत्रकार** असले जाणें मनीं मी खरें ।
मोठा त्यांतिल भाग काय नसतो सांगा तसा तो बरें ? ॥
खोटें मी वदलों असेल तर तें, भो सर्व **एडीटर** ।
मातें माफ करा असें विनवितों जोडोनि दोनी कर ॥ २० ॥

---

## बगले वकील.

ज्याणें घालविली तशी मिळविली ती **पेशवाई** बरी ।
जातीचा तरि **चित्तपावन** असें मत्प्रांत रत्नागिरी ॥
खाण्या ताककण्या, घरांत गरिबी, तें दुःख सांगू किती ।
भांवडें मज फार, बाप पिडला त्या कर्जभारें अती ॥ १ ॥

जेव्हां मद्गृह सोडुनी इकडला तो मार्ग म्यां सेविला ।
खुंटीला अपमान मान सगळा बांधोनियां ठेविला ॥
द्यावा गाल दुजा यदा मज मिळे एकावरी चापट ।
ऐसा निश्चय ये करूनि इकडे, होतों जरी तापट ॥ २ ॥

बापाच्या तरि ओळखीवरि पहा एकाकडे राहिलों ।
अन्नाची मम सोय ती ठरवितां अत्यंत मी त्रासलों ॥
ओली **माधुकरी**, तसे कधिमधिं म्यां **वार**ही लाविले ।
**फी** साटीं रखडोनि, हाय ! कितिदां थोरांस म्यां याचिलें ॥३॥

जो तो येउनियां हुकूम करितो त्यांचा जणूं किंकर ।
तेव्हां पत्करिल्या किती **शिकवण्या**, माझी नसे किंकिर ॥
वागें मी विनयें कसा गरिबसा, चेष्टा तशा साहतों ।
कोणी कांहिं करो, वदो, बडबडो, तें स्वस्थ मी पाहतों ॥ ४ ॥

वेळीं म्यां **स्वयपाक** तो करुनियां पानें किती वाढिलीं ।
लोकांचीं किति **धोतरें बडविलीं**, **उष्टीं** किती काढिलीं ॥
बोलोनी हळु, गोड फार विनयें मर्जीस संभाळतों ।
कोणा संशय ये असें निशिदिनीं तें कृत्य मी टाळतों ॥ ५ ॥

माझा त्रास कुणास होय असलें माझें करीं ना घडे ।
मुन्सीपालिटिच्या दिव्याजवळ तो माझे करीं मी धडे ॥
रात्रीं जागुनि वाचिलें बहु तदा **म्याट्रिक** मी जाहलों ।
**कॉलेजांत** शिकावयास मग मी **स्कालर्शिपें** राहिलों ॥६॥

शेंडी बांधुनि खुंटिला सतत मीं अभ्यास ते झोडिले ।
माथाकूट अहर्निशीं करुनियां डोळे तसे फोडिले ॥
गोळ्या खाउनि फार **फास्फरस**च्या मेंदूस उत्साहिलें ।
**ईराण्या**कडचा **चहा** पिउनियां म्या **जोर** कीं काढिले ॥७॥

**कास्मापालिटन** प्रकार करण्या आह्मीं तिथें मोकळे ।
नाहीं जात न गोत पंगत नसे, ना सोंवळें ओंवळें ॥
**खोडी दुष्ट** अह्मांस संगतिमुळें तेथें किती लागती ।
कित्येकां **क्षय** होतसे—असमयीं **मृत्यू**पथाची गती ! ॥ ८ ॥

**घोक्या** देउनि जेमतेम अगदीं **बी. ए.** पहा जाहलों ।
होण्याला फरडा **वकील** भरण्या ती **टर्म** मी लागलों ॥
झालों मी दरम्यान **मास्तर** पहा पोरें पढो कीं रडो ।
कोठोनी तरि खर्चवेंच सगळा बाहेर माझा पडो ॥ ९ ॥

पोटाची अशि सोय मी बघतसें केले किति म्या श्रम ।
माझें ज्ञान अगाध पाहुनि जना झाला बहु विभ्रम ॥
केली **श्याम इक्विटी** सकलहो **कांट्राक्ट** तोंडीं करी ।
नाहीं वाचुनि पाहिली उघडुनी सायंत **कॉमेंटरी** ॥ १० ॥

" जेव्हां होइन कीं **वकील** फरडा त्या **हायकोर्टांत** मी ।
" तेव्हां पाहुनि थक्क होतिल मला मी काय आहें कमी ॥
" पायीं बूट, नवीन सूट, पगडी, चष्माच नाकावरी ।
" तैसें रेशिमकांटिचें उपरणें घेईन अंगावरी ॥ ११ ॥

" माझें भाषण **जज्ज** ऐकुनी तदा ते दंग कीं होतिल ।
" माझा नित्यहि धन्यवाद सगळे तेव्हां, अहा ! गातिल ॥
"**ब्रीफां**चीं पडतील थोर पुडकीं त्या टेबलाच्या वरी ।
" मातें ना फुरसूद होइल तदा बाहेर किंवा घरीं ॥ १२ ॥

" **खोट्या** काढुनि कल्पना किति पहा वंचीन **जज्जां**सही ।
" मुद्दे मी हटवीन खोडुनि तसे अन्यां वकिलांसही ॥
" **केसी** जिंकुनियां पडेलच यदा सर्वांवरी छाप ती ।
" पैशाची सहजीं मिळेल मजला **ही थोरली रास** ती॥१३॥

" माझी चालिल ना **वकीलि** जरि तीं होईन **एडीटर** ।
" कीं **प्रोफेसर** मी उदारमतिनें होईन तो सत्वर ॥
" तैशीं छापिन **पुस्तकें** नवि नवीं, त्या **नोट्स** मीं काढिन ।
" किंवा **राष्ट्रिय**कारणीं झटुनियां कीर्तीस संपादिन"॥ १४ ॥

ऐसे येउनियां विचार मनिं ते देई परीक्षा बरी ।
नाहीं मी डरलों मुळीं प्रथम तो नापास झालों जरीं ॥
मातें तो जय येइ वर्षिं दुसऱ्या-क्या बात देखो अबी ।
पाटी मारुनि ऐटिनें, वसतसें होवोनि **एलेलबी** ॥ १५ ॥

देईना मज कोणि एक दिडकी, मी होतसें व्याकुळ ।
अशा सर्वहि व्यर्थ जाय मम ती, ना एक येई कुळ ॥
मातें मानुनिया नवा न धरिती विश्वास माझ्यावरी ।
बूटाचा मम खर्च तोहि न निघे, तें कर्ज होई शिरीं ॥ १६ ॥

बाकें ना पुरती अझास बसण्या त्या हायकोर्टांत तीं ।
मी घालोनि **झगा** उगा फिरतसें येथोनि तेथें किती ॥
येतां **केस** करीं चुकोनि तरि ती वाटे किती धन्य मी ।
वाचा कुंठित होउनी करितसें 'मी लॉर्ड,' 'मी लॉर्ड' मी ॥१७॥

वाटे लाज **वकील** होउनि पहा थोड्या रुपायांवरी-'
**बी. ए.** स्वस्त किर्तीक आज मिळती कैशी करूं मास्तरी ? ॥
काढोनी तरि ' नोट्स' कोण मम त्या घेईल चिंता अशी ।
मातें होय सदा, अहा मम गती होईल आतां कशी ? ॥ १८ ॥

होवोनी मम नापसंत सगळ्यां पत्रांस **आर्टीकलें** ।
माते ना मुळिं पत्रकार पुसती-मच्चित्त हे त्रासलें ॥
तोंडांतूनि निघे न शब्द अगदीं कीं **प्लाटफर्मांवरी** ।
इच्छा **राष्ट्रियकारणीं** वितळली-दुःखांत आलों घरीं ॥ १९ ॥

पाळी ही मजला उपाशि मरण्याची येउनी ठेपली ।
वर्षें चार सदैव यत्न करुनी अर्धा न ती लाभली ॥
माझी किंमत ना कुणास कळली, सर्वांत मी वाकब ।
झालों मी मग **रावसाहिब** अहा होवोनियां **मुन्सब** ॥२०॥

---

## फाटकी गोधडी.

वर्षें वीस जिच्या सवें अगदिं म्यां सौख्यामधें काढिलीं ।
नाहीं एकहि रात्र दूर सखि ती मत्पासुनी राहिली ॥
आतां काय करूं, करूं तरि कसें, कंठूं कशी ही घडी ।
हा हा हारविली मम प्रियसखी ती **फाटकी गोधडी** ॥ १ ॥

वस्त्रें चित्रविचित्र नेसुनि सदा आनंदवी जी मना ।
पाहोनी नवनीत देह मृदु ये आनंदीची मना ॥
झाली जीस समान काय कथुं मी प्रासाद वा झोंपडी ।
हा हा हारविली मम प्रियसखी ती **फाटकी गोधडी**॥ २ ॥

वर्णानें जरि सांवळी परि दिसे जी साजिरी गोजिरी ।
मर्यादा बहु जीस पायगतिं जी बैसे पलंगावरी ॥
ओढोनी विण घेतल्या कधिं नये सन्नीध जी बापडी ।
हा हा हारविली मम प्रियसखी ती **फाटकी गोधडी** ॥ ३ ॥

राहे जी मजला निशीं लपटुनी वृक्षा जशी ती लता ॥
होई स्पर्शसुखें किती तरि मला आनंद तो तत्वतां ॥
नाहीं झोंप मला तिच्याविण कदा ती येत एके घडी ॥
हा हा हारविली मम प्रियसखी ती **फाटकी गोधडी** ॥ ४ ॥

---

## सवत.

'येथें ये सखये'–'मशीं नच वदा'–'गे काय झालें तुतें' ॥
'माझे प्राण इथेंच टाकिन जरि स्पर्शाल मी सांगतें' ॥
रागानें धडके, शरीर भडके, ते ओंठ हो हालती ॥
राहे ती फिरवोनि तोंड अपुलें अश्रुगळे खालती ॥ १ ॥

'केला काय गुन्हा तुझा तरि असा तो सांग गे सुंदरी' ।
'माहेरीं मज पाठवा जरि तुम्हा मी नावडें अंतरीं' ॥
'मातें ना उमजे, उगाच तव हें'–'भोळ्या अम्ही बायका ।
खोटा कां दिधलास जन्म असला देवा जगन्नायका' ॥ २ ॥

"मागे तें दिधलें, तुला पुरविलें जें जें तुवां चाहिलें ।
लज्जेतें त्यजिलें, तुलाच भजिलें मागें न म्यां पाहिलें ॥
कोणी टोंचुनि बोललें–भगिनि ही माता–तरी साहिलें ।
जाणें तूं सगळें–तुलाचि सखये सर्वस्व म्यां वाहिलें" ॥ ३ ॥

" हो हो ठाउक भाषणें मजसि हीं छची, तुह्मा शोभती ।
वेड्या ज्या अबला, जयां न समजे, त्या ऐकुनी लोभती ॥
शास्त्रें जीं रडलीं, अह्मास नडलीं, तीं कां न हो जाळलीं ।
वागावें पुरुषें यथेष्ट, पण तीं आह्मां हवीं पाळलीं " ॥ ४ ॥

" व्हावें काय तुतें "–" मला न च पुसा "-" आश्चर्य वाटे मला " ।
" अन्याच्या नयनांत बोट शिरवी राहे परी तो भला " ॥
" आहे काय लचांड आज नव हें, तें सांग गे एकदां " ।
" खोटें प्रेम मशीं, मनांत गमली माझी **सपत्नी** सदा " ॥ ५ ॥

" घेवोनी तव आण सत्य वदतों "–" हो हो असे माहित ।
मेल्यें मी तरि त्यांत काय तुमचें झालें कमीसें हित ॥
झाला ना महिना पुरा मरुनियां मातें, तदा दूसरी ।
तुह्मांतें वरमाळ घालिल–कशी मातें तिची ये सरी " ॥ ६ ॥

" वेड्याचे परि काय हें अजि तुवां गे मांडिलें सुंदरी " ।
" वेडी मी ह्मणुनीच आजवरि तो विश्वास शब्दीं धरी " ॥
" झाली हद्द बुवा, शिकस्त करिसी "–" माझाच अन्याय हा । "
" माझी चूक कबूल, मौन धरितों "–" देवा बरा न्याय हा– ॥७॥

जेव्हां येउनि पाहवें निशिं इथें ती रांड तुह्मासवें ।
माझें ना मुदलींच भान, नयनीं येती तदा आसवें ॥
केली म्यां जर तीस दूर वदणें कोपें सदा होतसे ।
नाहीं मी वदल्यें चकार कधिंही तें राहवे हो कसें "॥ ८ ॥

जाणोनि सगळा मनांत अपुल्या साचा तिचा भाव तो ।
रागाचा मग म्यां–सखीस वदलों–आणोनियां आव तो ॥
" हां हां आवर जीभ, काय बकसी, वाटे न लज्जा कसी ।
केले लाड तुझे ह्मणूनि गमतें तूं फार शेफारसी " ॥ ९ ॥

"माझा हक्क असे"–" तरी पण तुला मी चक्क गे सांगतों ।
अर्धांगी प्रिय तूं खरी पण तिला मी श्रेष्ठ गे मानतों ॥
अन्नें षड्रस मान पान अथवा रंभा गमेना तशी ।
तेव्हां ही सहचारिणी प्रियसखी **निद्रा** त्यजूं मी कशी ॥१०॥

जन्मापासुनि बाल्य सर्व मम गे जीच्या सवें गाळिलें ।
माता ती यदि कामकाज करण्या गुंते तदा पाळिलें ॥
कृष्णाची जणुं काळजी निशिदिनीं त्या राधिकेला जशी ।
तेव्हां ही सहचारिणी प्रियसखी **निद्रा** त्यजूं मी कशी ॥ ११ ॥

होतों गे शिशु जेधवां विहरलों, मी नाचलों, खेळलों ।
अभ्यासें श्रमलों, लिहोनि दमलों, शाळेस कंटाळलों ॥
झाली जी श्रमहारिणी व्यसनितें ती भांग गांजा जशी ।
तेव्हां ही सहचारिणी प्रियसखी **निद्रा** त्यजूं मी कशी ॥ १२ ॥

जेव्हां ओळख ती तुशीं नव्हति गे झाली तिची संगती ।
सर्वस्वी सुखदायिनी मज, तिची वर्णूं महत्ता किती ॥
मातें प्राणसमा जशी प्रियतमा त्या विक्रमा उर्वशी ।
तेव्हां ही सहचारिणी प्रियसखी **निद्रा** त्यजूं मी कशी ॥ १३ ॥

नाहीं गे जर एक रात्र मजला ती भेटली सुंदरी ।
डोकें तें उठतें, शरीर फुटतें, डोळ्यांस लागे झरी ॥
उत्साहें नच कांहिं एक करवे होई बहू आळशी ।
तेव्हां ही सहचारिणी प्रियसखी **निद्रा** त्यजूं मी कशी " ॥१४॥

" मानोनी तिजला समान भगिनी स्वाधीन राहीन मी ।
झाली कीं प्रिय जी तुह्मांस, तिजला प्रेमेंच पाहीन मी ॥
होतो त्रास तुह्मास खास मम तो, तीतें सदा सेविन ।
द्यावा ताप तुह्मा पुन्हा न कधिंही या निश्चया ठेविन " ॥ १५ ॥

ऐसें ती वदली सवेंच हंसली, जाया निघे बाहिर ।
वाटे मी फसलों, खरा घसरलों, मी राहिलों गंभिर ॥
झालें काय पुढें स्मरे न मज तें जें चाललों बोललों ।
जाणें ती परि एक गोष्ट अवघी कीं स्वस्थ मी झोंपलों ॥ १६ ॥

---

## कर्मठ.

येतां तो उदयाचलीं प्रतिदिनीं चंडांशु तेजोनिधी ।
मी घेईं अपुला सदा उरकुनी प्रातर्विधी तो अर्धी ॥
चोळोनी मग अर्धतास धुतले म्यां हस्तपादादिक ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ १ ॥

माझें स्नान घडे तदा झडकरी शीतोदकें निर्मळ ।
रक्षा भस्म चुलीतलें तनुवरी फांसोनियां पुष्कळ ॥
देशीधोतर नेसतों विमल हें पायीं दिसे घोळक ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ २ ॥

कंठीं अक्षमणी कसे विलसती थाटांत नाहीं कमी ।
पोटीं षड्रिपु उग्ररूप वसती झांकावया त्यांस मी ॥
हातीं **गौमुखि** फार वेळ जपली किंवा धरीं **नासिक** ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ ३ ॥

**पोथी** घेउनि एक लहु कसली नित्यकर्में वाचिली ।
**दूबोटी** मग उच्च भालपटलीं रेखोनियां लाविली ॥
**स्तोत्रें** मी रटतों मनांत अवघीं, भासें जनां भाविक ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ ४ ॥

नाहीं कीं मज राहवे मुळिं **चहा** तो घेतल्यावांचुन ।
सांगें मी इतरांस होय परि तो तोटा तयापासुन ॥
ब्रह्मज्ञान परांस नित्य कथनीं मानीं मनीं सार्थक ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ ५ ॥

माझा **शाक्त** पिता, बरी मज गमे ती **बाटली** यद्यपि ।
लोकां सांगतसें–'अहो सुजन हो, होऊं नका **मद्यपी** ॥
मद्यानें तनुची दशा उडतसे, धर्मास जें बाधक' ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ ६ ॥

**खातेदार इराणि** नित्य मजला देई **चहा** फारसा ।
तेथें खाउनि **भात** निर्मळ सदा राहें जसा आरसा ॥
प्रायश्चित्त दिलें **चहाप्रकरणीं** अन्यांस, जें सात्विक ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ ७ ॥

पाहोनी हतदैव **बालविधवा** माझे मनीं ये दया ।
आहे इष्ट **पुनर्विवाह** पण तो अन्यांस सांगावया ॥
नाहीं धैर्य मला, अहा मम नसे कार्यास तो साधक ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ ८ ॥

तैसा **बालविवाह** मान्य न मला, **स्त्रीशिक्षणीं** प्रेम तें ।
लोकांनां परि सांगतों निशिदिनीं ' हीं गैर माझ्या मतें ' ॥
जें जें इष्ट तयास नेष्ट ह्मणतों हें ब्रीद शुद्धात्मक ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ ९ ॥

लोकांतें चकवावयास च नवीं म्यां तीं **खुळें** काढिलीं ।
व्याख्यानीं, ममलेखनीं चटुजनीं अत्यंत वाखाणलीं ॥
**देव्हारे** किति माजवीं, **परिषदा** दांभीक वा **धार्मिक** ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ १० ॥

जे कोणी वदती विरुद्ध अमुच्या ते **देशशत्रू** गणीं ।
घालोनी मग **युक्तिवाद** ठरवीं मी पूर्ण त्यां दुर्गुणी ॥
त्यांचें वर्तन शुद्ध होय तरि ते **बाह्ये** खरे **निंदक** ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ ११ ॥

**लोकप्रीति** अशा रिती मिळविली कीर्ती तशी सोज्वळ ।
ठावें सर्व **सुधारकांस** अमुचें दुर्जेय वाणीवल ॥
आह्मां फक्त जनीं पुढार दिधला कार्यांत **सामाजिक** ।
ऐसा **कर्मठ** मी पहा झळकलों देशास उद्धारक ॥ १२ ॥

---

## फांकडा हवालदार.

येवोनी मुलखांतुनी प्रथम मी ती हेलपाटी करीं ।
**बाल्या** होउनि राहिलों मग पुढें एका **प्रभूच्या** घरीं ॥
सोकाजी बहु चांगला मम धनी, बाई लई वाइट ।
गेला काळ मजेंत तेथ परि ती ना सोसवे किट्किट ॥ १ ॥

झालों सार्वजनीक मी मग गडी, चाळींतलीं धोतरें- ।
भांडीं धूउनि घांसुनी निशिदिनीं धुंडाळलीं म्यां घरें ॥
धंदा ना मज हाहि सत्य रुचला कंटाळुनी शेवटीं ।
दादा, **पोलिस** जाहलों, लटकवीं सोंटा व पट्टा कटीं ॥ २ ॥

पागोटी पिंवळी झुके कशि शिरीं एकाच कानावरी ।
काळा ड्रेस सुरेख केंस दिसती झोंकांत भाळावरी ॥
दीपस्तंभ उभा अहर्निश जसा त्या मुन्सिपालीटिचा ।
रात्रीं वा दिवसास काळ निघतो नाक्यावरी आमुचा ॥ ३ ॥

जातों सर्व **हडेरहप्प** करण्या आठादिशीं दोनदां ।
माझा चक्क ' डरेस ' पाहुनि कुणी घुस्से न होती कदां ॥
भीती लोक किती सदैव मजला, मातें भिती ना जरा ।
देतों पीळ मिशीस राहुनि उभा मी **बाणकोटी** खरा ॥ ४ ॥

टप्याचे बदमाष चोर सगळे मातें पुरे माहित ।
होतां जास्त कमी तयां पकडितों माझ्या जरी हद्दिंत ॥
माझे दोस्त कितीक रोज बनती लुच्चे खिसेकातरू ।
देती भाग तयांस एकदम ना आह्मीं कदापी धरूं ॥ ५ ॥

दृष्टी ती मम **कावळ्या**परि असे सर्वांवरी सारखी !
किंवा **नायकिणी**परी बघुनियां सर्वांस मी पारखीं ॥
खालीं घालुनि मान जेवि **असती** दृष्टी करी वांकडी ।
तैसा मी बघतों जनांस अवघ्या, खासा शिपाई गडी ॥ ६ ॥

कोल्ह्याचे परि, धूर्त मी किति तरी, चाणाक्ष आहें जरी ।
कोल्ह्याचे परि, संकटास भिउनी राहें सदा मी दुरी ॥
कोल्ह्याचे परि, भांडुनीच दमतां दोघांस मी बांधतों ।
कोल्ह्याचे परि, कार्यभाग अपुला संभाळुनी साधतों ॥ ७ ॥

कुत्र्याचे परि, मी इमानि अगदीं सर्कारचा चाकर ।
कुत्र्याचे परि, तोंड बंद धरितों देतां मला भाकर ॥
कुत्र्याचे परि जागुनीच उठतों तें खुट्ट होतां जरा ।
कुत्र्याचे परि, जो भितो मज, करीं त्यातें सदा घाबरा ॥८॥

बोक्याचे परि, मी दिसें गरिबसा, राहें धरोनी दडी ।
बोक्याचे परि, चोरमूषक धरीं, माझी चुकेना उडी ॥
बोक्याचे परि, वित्त-दुग्ध बघतां मजीभली कीं चळे ।
बोक्याचे परि, सावधान नसतां पाठींत सोंटा मिळे ॥ ९ ॥

भाजीवालिस दुःख देउनि अहा मिर्च्या किती काढतों ।
पेरुवालिस त्या तशी अडवुनी पेरू किती लाटतों ॥
केळीं सोलुनि खातसें मुफतचीं, माझा जणूं तो कर ।
बोले कोण विशाद होय मज, मी सर्कारचा नोकर ॥ १० ॥

हक्कें मागुनियां विड्या फुकटच्या मी स्वस्थ ओढीतसें ।
गाडीवान भिऊनि दे चिरिमिरी त्यालाच सोडीतसें ॥
माझी मेहरबानि होय सगळी जाणा **कलालावरी** ।
माझा देह तसा खिसा गरम जो आभारभारें करी ॥ ११ ॥

चोरी कीं जरि होतसे जबर ती किंवा दरोडा पडे ।
तेव्हां सर्वहि बाजुंनीं मज पहा तो फायदा सांपडे ॥
चोरी ज्या घरिं जाहली तरि असें तेथें अह्मीं गोंधळ ।
जावोनी किति घालतों नच कळे याची दुज्यांना कळ ॥ १२ ॥

आह्मी जाउनि सर्व तेथ जमतों घेतों जबान्या तदा ।
' कोणाच्यावर तो वहीम तुमचा आह्मांस आतां वदा ' ॥
दुःखानें धनि कांहीं एक न वदे, येवोनियां घाइस- ।
आह्मी नोकरचाकरां बडवितों स्वैंपाकिणीबाइस ॥ १३ ॥

चोरीचा जरि माल सर्वहि मिळे देवोनि पत्ता न तो ।
त्याचे भाग सदैव तीन करुनी चोरा मिळे एक तो ॥
जाई भाग दुजा अचानक कुठें तें ठाउकें ना मला ।
बाकीचा मग मालकास अवघा तो माल कीं लाभला ॥ १४ ॥

नाहीं सांपडलाच चोर तर मी एका गरीबास तो ।
देवोनी **समजूत** त्यास कबुलीं मी शेवटीं आणतों ॥
तेव्हां तो बनवोनि हाय कितिदां देतों पुरावा नवा ।
कोणाला तरि न्याय सत्य मिळता याचा पुरा वानवा ॥ १५ ॥

कोणाची अवरू कुठें हरिन मी याचा नसे नेम कीं ।
कोणापासुनि लाभ होय असलीं शोधीं घरें नेमकीं ॥
माथ्याचा कुणि भेटतां नमुनियां त्याची करीं नोकरी ।
येतां वेळ तयासही तुडविण्या केव्हां कमी ना करीं ॥ १६ ॥

वाटे तो **यमदूत** फार बरवा तो एकदां मात्र ये ।
लोकांतें कितिदां कसें धरिन मी तें काय बोलून ये ? ॥
न्यायें शासन **दूत** सत्य करिती, मातें दया ना जरा ।
न्यायान्यायविचार नाहिं मजला तो **स्वार्थ** वाटे वरा॥१७॥

वापीमाजि पडोनि, खाउनि अफू, कोणी बुडो वा मरो ।
माझा पाय असे तिथें प्रथम तो, कीं खून कोणी करो ॥
वारा पाउस थंडी रात्र दिवसां माझा खडा पाहरा ।
कोठेंही मज धाडतां परि नसे तक्रार माझी जरा ॥ १८ ॥

चोऱ्या ऱ्यां पकडोनियां मिळविली ती फीत हातावरी ।
नेकी पाहुनियां मदीय बढती साहेब माझा करी ॥
गोऱ्यांचे किति बूट ' पालिस ' करीं, केलें न केव्हां कमी ।
झालों आज **हवालदार** बनुनी मी धन्य, मी धन्य, मी ॥१९॥

---

## स्टेट सेक्रेटरी.

दैवें वैभव लाभलें, मज गमे माझ्यापरी ना दुजा ।
पायीं लीन मदीय दीन दिसते ही **आर्यभू**ची प्रजा ॥
कोणा मी न गणीं, असे मम धनी तो **लार्ड सालिस्बरी** ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ १ ॥

माझा पक्ष करील जो हुकुम तो मौनव्रतें पाळणें ।
न्यायान्यायविचार सर्व मम तत्प्रीत्यर्थ कीं टाळणें ॥
आहे जोंवरि तो बलिष्ठ मज ना भीती जरा अंतरीं ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ २ ॥

ज्यानें ह्या मजला पदीं चढविलें तो प्रांत **म्यांचेस्टर** ।
आहे तद्धित पाहणें निशिदिनीं कर्तव्य माझ्यावर ॥
हाताखालिल अन्यराष्ट्र पिळतो मत्कायदा सत्वरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ ३ ॥

**टोरी** पक्ष विरुद्ध व्यर्थ दिसतो त्या **आर्यभू**च्या जनां ।
दोन्हीं **पक्ष समान** नाडिति, खरें वाटे न हें तन्मना ॥
**इंग्लंडा**पुरतेच पक्ष असती आह्मांत सर्वोपरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ ४ ॥

उद्योगी जरि फार, कांहिं न पिके **इंग्लंड** देशीं अहा ।
आह्मातें पुरवीत धान्य सगळीं तीं **अन्य** राष्ट्रें पहा ॥
आहे भिस्त समस्त सत्य अमुची त्या **आर्यभू**च्यावरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ ५ ॥

ओझें ही गमते **लढाइ** परि तें तेणें मिळे वैभव ।
तैशीं ये कबजांत थोर अपुल्या **व्यापार-ठाणीं** नव ॥
**अन्याचें धन** साधल्यास मिळतां देतों लढाई तरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ ६ ॥

कोठेंही करणें असेल तरि ती आह्मां लढाई बरें ।
**काळें सैन्य** सदैव हाय! अमुच्यासाठीं बिचारें मरे ।
**हिंदुस्थान** अफाट देश मज तो स्वाधीन कीं जोंवरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ ७ ॥

जैशी ती **जळु** चोखिते हळुहळू देहांतलें शोणित ।
किंवा **उंदिर** कुर्तडे शरिर हें रात्रीं जसें फुंकित ॥
तैसा मी सकलां खुषी करुनियां मत्कार्य अंतीं करीं ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ ८ ॥

भीती हे थरकांप सर्व मजला **नेटीव्ह संस्थानिक** ।
**इंग्लंडा**स्तव भीतिनें खरचती आशेंत वित्तादिक ॥
मातें नाखुष जो करील तर तो **एजंट** राज्याहरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ ९ ॥

**एजंटा**स सदैव रक्षित असें, **प्रेस्टीज** मी राखतों ।
**पत्रें** ओरडती ' किती जुलुम हा ' त्यांनाहि धिःकारितों ॥
**गारोड्या**परि पोतडें मम असे **ब्ल्यूबूक** नामें तरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ १० ॥

कोट्या मी करितों कितीक खुबिच्या युक्त्या नव्या काढितों ।
साहेना करभार थोर असला सर्वांशिरीं लादतों ॥
गाईच्यापरि हंबरे **भरतभू**, मातें दया नान्तरीं ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ ११ ॥

शब्दांचा किती **अर्थ** कीं **बदलुनी** मी फायदा घेतसें ।
तक्रारींस **जबाब** ना **सरळ** मी कोणासही देतसें ॥
भाषा **इंग्लिश** कीं कशी मदत ती मातें पहा ही करी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ १२ ॥

देवो **व्हॉइसरॉय** संमति न वा, त्या **पार्लमेंटां**त तें ।
होवो भांडण कायसें करितसें मातें जसें वाटतें ॥
घेतो सत्य मला **स्वपक्ष** कितिदां संभाळुनी सत्वरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ १३ ॥

आहे देश विशाल, मूठभरही नाहीं तिथें जाणते ।
नाहीं ज्ञान कुणास त्या समजण्या माझ्या कृती, वाटतें ॥
कां ही ओरड **कृष्ण–काय** करिती कीं व्यर्थ मूढांपरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ १४ ॥

अन्यायें बहु तो जुलूम घडतां होते यदा ओरड ।
त्याचा न्याय करावया **कमिशनें** मी नेमितों तीं जड ॥
त्यांचा तो परि सर्व **खर्च** ढकलीं त्या **भारतीयां**वरी ।
झालों धन्य खराच आज बनुनी मी स्टेट सेक्रेटरी ॥ १५ ॥

---

## मारवाडी.

माझा तो **मरु** देश ना जळ मिळे डोळ्यांस लावावया ।
नाहीं एकहि सस्त वस्त तिकडे कोणा न माया दया ॥
पाण्यावाचुनि घाण सर्व पसरे रस्ते न वाटा बरें ।
वृक्षा वाचुनि रुक्ष गांव दिसतो, तीं चंद्रमौळी घरें ॥ १ ॥

नेसाया फडकीं, घरांत मडकीं, ढोरें गुरें रोडकीं ।
दुर्गंधी सडकीं, मुलेंच रडकीं, स्त्री ना वदे गोड कीं ॥
वस्त्रें ना धडकीं, न कांहिं धड कीं, ती वाजही तोडकी ।
गांठीं ना दिडकी, घरा न खिडकी, दारें सदा मोडकीं ॥ २ ॥

स्त्रीतें ना लुगडीं, फिरेच उघडी, अंगीं न चोळी घडी ।
नाहीं वांगडी, वर्ष ज्यास न धुणें तो घागरा रांगडी ॥
देई मी चमडी, सुटे न दमडी, पोरांस ना आंगडीं ।
ज्ञानें आटवडी, मुखीं गुडगुडी, तंबाकुची तें जुडी ॥ ३ ॥

अंगीं घर्मपुटें किती मन विटे पाहोनियां चिर्गुटें ।
नाहीं मान घरांत ठेवित कुणी मोठें तसें धाकुटें ॥
नीती ना धृति ना मती न नति ना कोणा न भीती रती ।
ऐसा सोडुनि देश मी निसटलों, वानूं तया मी किती ॥ ४ ॥

माथीं बांधुनि लाल लांब फडकें लोटा रशी लांबशी ।
नेसाया परि एक धोतर असे, बंडी तशी जाडशी ॥
घेई पांघरण्यास जाडि भरडी पासोडिची ती घडी ।
वेषें या अनवाणि सोडित गृहा हा **मारवाडी** गडी ॥ ५ ॥

घेवोनी खुरदा, त्यजोनि सुहृदा, सोसोनिया आपदा ।
चालें नित्य पदीं, अधीं कपरधी म्यां सोडिली ना कदा ॥
माझें पोट भरे, चणे चुरमुरे, खावोनि मार्गी बरें ।
चेष्टा लोक किती उगाच करिती मी मानसीं घाबरें ॥ ६ ॥

वृक्षा खालिं निजें, भिजें कधिं मधीं, थंडींत केव्हां थिजें ।
येतां संकट घट्ट चित्त करुनी तें सोशिती स्वार्थि जे ॥
ऐसा म्या क्रमिला सुमार्ग अपुला त्रासोनिया अंतरीं ।
येवोनी मग टाकलों अहह मी या थोर **मुंबापुरीं** ॥ ७ ॥

आलों मी अगदीं नवा यदि इथें मातें नसे आसरा ।
फुट्टाणे, बरवे चणे विकुनियां म्या गाळिलें वासरा ॥
रात्रीं **पांजरपोळ** शोधुनि तिथें मी आडवा होतसें ।
कोठें आश्रय ज्यास ना तरि बरें त्यानें करावें कसें ॥ ८ ॥

**लाल्या** होउनिया भजीं विकियलीं ती डाळ नामी कशी ।
माथीं घेउनिया डबा फिरत मी **राकेल** फेरी तशी ॥
**तांबा पित्तल मोड तोड** विकलीं भांडीं तशीं चांगलीं ।
किंवा गोधुम वाल तांदुळ भरें ती **गोण** म्या वाहिली ॥ ९ ॥

हीरा हिंग मिरीं सुवासिक जिरी सामान नानापरी ।
फेरी हिंडुनि मांडुनीच अथवा खाशा दुकानांतरीं ॥
बर्फी सुंदर केशरी, व हलवा, पेढे, मिठाई खवा ।
तैसे घीवर, शेव, लाडु, जिलबी हा माल ताजा नवा ॥ १० ॥

धंदे पत्करिले असे अखिल म्या, कीं फायदा पाहणें ।
केव्हां साखर तेल तूप विकिलें, खासा **किराणी** बनें ॥
' धीनूं दोढियुं दोढियानुं पछि घी, पैसा थया ते त्रण ' ।
एकाचे तरि तीन मी करितसें नाडोनिया ते जन ॥ ११ ॥

जातीचा मम भागिदार बघुनी **पेढी** नवी काढली ।
पुंजी ती मम धाकटी हळुहळू यत्नें महा वाढली ॥
खातीं **तीन** अशी तदा बनविलीं लोकांस कीं वंचण्या ।
कोर्टासाठिं नवीं, कुळांसहि नवीं, आह्मा दुजीं पाहण्या ॥ १२॥

पैशाच्या सकळां किती अडचणी दीनांस थोरांसही ।
दुःखें संकट कांहिं काळ पुरुषां येती अकस्मातही ॥
अंतीं त्रासुनि लोक कांस धरिती ते आमची सत्वर ।
पैसे देउनि संकटें हरितसों—आभार लोकांवर ॥ १३ ॥

पेढी मी उघडी पहा हरघडी रात्रीस ठेवीं तशी ।
थोरांचीं **उधळीं** मुलें, जन तसे ते **सभ्य** येती निशीं ॥
माझें व्याज कमी, नसे मुळिं हमी, टक्के दहा घेत मी ।
चोरीचा जरि माल होय तरि तो थोड्यांत ठेवीत मी ॥ १४ ॥

देई शंभर ते हजार रुपयांची ती चिटी होतसे ।
**कोऱ्या** तीन चिट्या, तयांवर सह्या त्याचे करीं घेतसें ॥
घेतों व्याजच कापुनी प्रथम मी—सोप्या किती या अटी ।
सांगें मी अगदिं मनीं भिउं नको, ही फक्त **सिक्यूरिटी** ॥ १५॥

देई तो जर कीं दहा तरि पहा केले जमा शंभर ।
ऐशा याच रितीं अह्मी करितसों खात्यावरीं ती भर ॥
येतां शंभर ते हजार करितों सव्याज खातीं जमा ।
फेडी जो मुदतींत कर्ज अपुलें त्यातें करीं मी क्षमा ॥ १६ ॥

ना दे जो मुदतींत कर्ज अपुलें हप्ता न दे व्याज ही ।
तेव्हां मोडुनि खोड सत्य हरितों त्याची जनीं लाज ही ॥
फेऱ्या घालुनि झीजवी उंबरठे त्याचे किती नेहमी ।
अंतीं काढुनिया **समन्स** घसडीं त्या **स्मालकॉजांत** मी ॥ १७ ॥

कोऱ्या तीन चिठ्या लिहोनि भरल्या केले सहस्रद्वय ।
त्याची त्यांवर गुंतली जर सही मातें कशाचें भय ॥
फिर्यादींत हजार दोन लिहिले कां म्या करावें कमी ।
मातें जो चकवी तयास ठकवीं सोडीं कदा त्या न मी ॥ १८ ॥

भांडीं काढुनि जप्त सर्व करितों, नेतों तुरुंगांत ही ।
हप्ता घे ठरवोनि कोरटिं पहा, त्या तोडजोडीसही ॥
केली म्या कबुली, जरी तिपटिनें मातें मिळे रक्कम ।
स्वार्थी लक्ष धरीं यदा कुळ मिळे तें दीन वा भक्कम ॥ १९ ॥

पैसे याच रिती बहू मिळवुनी देशांत मी जातसें ।
'**लॉडिझ्री**' वरुनी सुरेख बघुनी येथें पुन्हा येतसें ॥
खालीं पोट दिसे तरी फिकिर ना ती तोंड कीं झांकतें ।
नेसोनी मग घागरा ठुमकते, बोटांतुनी पाहते ॥ २० ॥

येई पत्र यदा गृहाहुनि मला देशांतुनी आमच्या ।
वाचाया तरी सात आठ जमती ही आमुची कीं मजा ।
अर्थाचा कितिदां अनर्थ घडतो, कीं व्यर्थ घोंटाळतों ॥
कंटाळोंनि अहा अह्मीं किति तरी तें वाचणें टाळतों ॥ २१ ॥

**शीपाई** अडवी, अह्मास बडवी तो स्टेशनाचे वरी ।
**पार्शी** तो चिडवी, उगाच रडवी, चेष्टोनि नाना परी ॥
गाठोडें दडवी, सदैव घडवी तो त्रास आह्मास कीं ।
केव्हां तो चढवी मुखांत, गमतें हा प्राण जाई नक्की ॥ २२ ॥

इंग्रेजापरि, देश सोडुनि पहा आह्मी इथें पातलों ।
इंग्रेजापरि, आप्तइष्ट सुटले मी एकला राहिलों ॥
इंग्रेजापरि, सौम्यवृत्ति धरुनी धंदाच आरंभिला ।
इंग्रेजापरि, कार्यभाग सरतां हा देश कीं सोडिला ॥ २३ ॥

इंग्रेजापरि, आपसांत मुळिं ना तंटा कधीं लागला ।
इंग्रेजापरि, ऐक्यभाव वरुनी व्यापार तो मांडिला ॥
इंग्रेजापरि, रोजगार सगळे-जोडे चिकूं लागलों ।
इंग्रेजापरि, संपदा मिळवुनी आह्मी पहा चाललों ॥ २४ ॥

इंग्रेजापरि, गोड गोड वदुनी कार्यास साधीतसों ।
इंग्रेजापरि, दूरदृष्टि अमुची निंदाहि सोशीतसों ॥
इंग्रेजापरि, एक बोलुनि दुजें लोकांस तें दावितों ।
इंग्रेजापरि, तें मनांत तिसरें, चौथ्या कृती राखितों ॥ २५ ॥

इंग्रेजापरि, कोणि कांहिं वदले त्याची न पर्वा जरा ।
इंग्रेजापरि, मानतों निशिदिनीं हा **स्वार्थ** कीं साजरा ॥
राखों **जात्यभिमान धर्म**हि तसा त्या इंग्रजांच्या परी ।
चाखों **न्याय समान** सत्य इकडे त्या इंग्रजांच्या करीं॥२६॥

सेवा सेवा सुखद **झुटिला**, वागवा **देशसेवा** ।
ठेवा ठेवा हृदयिं अपुल्या **स्वाभिमानास** ठेवा ॥
राहो राहो सुमनिं तुमच्या **स्वार्थ** तो पूर्ण राहो ।
व्हा हो, व्हा हो, अखिल जन हो, **मारवाडी** बना हो ॥२७॥

---

## प्रि० गोपाळ गणेश आगरकर एम्. ए.,
## यांचें चरित्र.

**किंमत ४ आणे.**

ट० ख० १ आणा.

हें चरित्र **रा० रा० हरि बल्लाळ परचुरे बी. ए.,** यांनीं लिहिलें आहे. आमची कोणत्याही प्रकारची **आठ आण्याची शाई** घेणारांस हें पुस्तक बक्षिस मिळेल.

---

**शिवाजी महाराज यांची उत्तम जाड फोटो कलर मधील तसबीर:-** किं० २ आणे ट० ख० अर्धा आणा. आमची कोणत्याही प्रकारची फक्त **४ आण्याची शाई** घेणारांस ही तसबीर बक्षिस मिळेल.

---

**राष्ट्रीयसभेच्या जन्माची तसबीर:-** ही तसबीर काल्पनिक असून जाड देशी कागदांवर काढिली आहे. **किं० १ आणा** ट० ख० अर्धा आणा. आमची फक्त **२ दोन आण्याची शाई** घेणारांस ही तसबीर बक्षिस मिळेल.

---

## रा० रा० गंगाधर नरसिंह केतकर
## वकील नाशिक डिस्ट्रिक्ट.

याचें चरित्र **रा० रा० हरि बल्लाळ परचुरे बी. ए.,** यांनीं लिहिलें आहे, हें हल्लीं छापत आहे; लवकरच बाहेर पडेल. किंमत **अडीच आणे** ट० ख० अर्धा आणा. आमची कोणत्याही प्रकारची **सहा आण्याची शाई** घेणारांस हें पुस्तक बक्षिस मिळेल.

आमच्याकडील पुस्तकें व इतर कोणताही माल येथील सर्व बुकसेलरांकडे विकत मिळेल.

आमची फक्त आठ आण्याची कोणत्याही प्रकारची शाई घेणारांस हें **अगदींच नवीन** कवितेचें पुस्तक बक्षिस मिळेल.

वरील बक्षिसें फक्त आमच्या कारखान्यांतून शाई घेणारांसच मिळतील. बाहेर गांवच्या लोकांनीं शाईचीं पुस्तकें मागविल्यास वरील बक्षिसांबरोबरच ती बुक-पोष्टनें पाठविण्यास सोईवार पडेल. ८॥ आण्याची पोष्टाचीं तिकिटें पाठविलीं असतां चालतील. वर्तावळ्याकरितां एक तिकीट ज्यास्त पाठवावें.

**पुणें येथें—महाराष्ट्र बुकडिपो बुधवार पेठ पुणें,**
**न्यूकिताबखाना बुधवार पेठ पुणें.**

**पत्ता—यशवंत बाळकृष्ण क्षीरसागर,** जनरल मर्चंट, कमिशन एजंट व पब्लिशर गिरगांव चर्नीरस्ता, मुंबई.

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | श्लोक. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|
| ३२ | १० | ३ | केली श्याम इकिटी– | केली श्यामच इकिटी. |

बाहेरगांवच्या लोकांकरितां उत्तम सोय.

# क्षीरसागर यांचें आडतीचें दुकान, मुंबई.

आमच्या दुकानांतील अगर दुसरा कोणताही माल, अजमासानें आगाऊ पैसे आले असतां चांगला कसोशीनें खरेदी करून लवकर पाठविण्यांत येईल. बाकी राहिलेल्या रकमेबद्दल व्हि. पी. केली जाईल. गिऱ्हाईक खात्रीलायक वाटल्यास माल व्ही. पि. नें पाठवूं. कमिशन शेंकडा दोन रुपये. प्याकिंग वगैरे खर्च शिवाय पडेल. घाऊक व्यापारी लोकांकरितां कमिशनचे माफक दर ठेविले आहेत.

## क्षीरसागर यांचा प्रसिद्ध शाईचा कारखाना, मुंबई.

आमच्या कारखान्यांत तयार होणाऱ्या सर्व प्रकारच्या शाईच्या उत्तम गुणाबद्दल आतां आबालवृद्धांची खात्री होऊन चुकली आहे. आमच्या शाईचा दिवसानुदिवस जारीनें होत असलेला खप हाच तिच्या गुणाबद्दल खात्री देत आहे. शाई अतिशय स्वस्त असून शिवाय तिजवर उपयुक्त बक्षिसेंही ठेविलीं आहेत. व्यापारी लोकांस चांगलें कमिशन दिलें जातें. शाईच्या पुड्या, बंडलें, बाटल्या, व बुकेंही आहेत. बुकें पोष्टांतून पाठविण्यास खर्चकमी लागतो.

आमचे दुकानांत सर्व प्रकारचा स्टेशनरी माल, इंग्रजी व मराठी पुस्तकें, व इतर देशी व विलायती पुष्कळ प्रकारचा माल मिळतो. **चित्रबोध हें पुस्तक आमचेकडे** मिळेल. व्यापाऱ्यांस कमिशन चांगलें दिलें जाईल. विशेष माहिती उत्तराकरितां तिकीट आलें असतां मिळेल.

पत्ता—यशवंत बाळकृष्ण क्षीरसागर जनरल-मर्चंट व कमिशन एजंट, गिरगांव चर्नीरस्ता, मुंबई.